**महाराष्ट्रातील सर्व दुकाने ,आस्थापना, वाणिज्यिक संस्था, हॉटेल्स, आहारगृहे इत्यादींचे नाम फलक मराठीत लिहिण्याबाबत**

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
परिपत्रक क्रमांक-बीएसई ०५/२००८/प्र.क्र.८५१६/कामगार-९
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक-३१/०५/२००८.
संदर्भ- शासन अधिसूचना क्रमांक-बीएसई-१५८१/प्र.क्र.५०४२/कामगार-५,
दिनांक-७/०९/१९८१

**परिपत्रक**

मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम-१९४८ व महाराष्ट्र दुकाने व संस्था नियम-१९६१ ची अंमलबजावणी महाराष्ट्रात बृहन्मुंबईव्यतिरिक्त कामगार विभाग राज्यात कामगार आयुक्तांमार्फत करण्यात येते.

मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम-१९४८ मध्ये सर्व दुकाने, संस्था, वाणिज्यिक आस्थापना, निवासी हॉटेल्स, आहारगृहे व खाद्यगृहे, नाट्यगृहे किंवा सार्वजनिक मनोरंजनाची अथवा करमणुकीची इतर ठिकाणे इ. अतर्भूत होतात.

वर नमुद केलेल्या दुकानांच्या किंवा आस्थापनेच्या दर्शनी भागावर संबंधित आस्थापनेचे नांव असलेले नाम फलक असतात. महाराष्ट्र दुकाने व संस्था नियम-१९६१ च्या कलम २०-अ मध्ये अंतर्भूत केलेल्या तरतुदीनुसार प्रत्येक दुकान व आस्थापनेचा नाम फलक मराठी भाषेत व देवनागरी लिपीत लिहिणे बंधनकारक केले आहे. या तरतुदींचे पालन करण्याबाबत आवश्क त्या सूचना सर्व संबंधितांना यापूर्वीच शासन अधिसूचना, दिनांक-७/०९/१९८१ अन्वये देण्यात आलेल्या आहेत. तरीही काही ठिकाणी असे दिसुन आले आहे की, दुकाने व आस्थापना यांचे नाम फलक मराठीत न लिहिता इतर भाषेत लिहिलेले असतात. महाराष्ट्र दुकाने व संस्था नियम-१९६१ च्या कलम २०-अ नुसार नाम फलक मराठी व्यतिरिक्त इतरही भाषेत लिहु शकतात. तथापि मराठी भाषेमध्ये नाम फलक लिहिणे बंधनकारक आहे,असे यापूर्वीच्या परिपत्रकानुसार आपणांस कळविण्यात आलेले आहे.

ROTA)H 1008(500-8-08) \ (कृ.मा.प.

C:\THORVE\Marathi Board.doc

तथापि असे निदर्शनास आले आहे की, अजुनही काही दुकाने व आस्थापनांचे नाम फलक मराठीत लिहिले जात नाहीत.

तरी आता या परिपत्रकाद्वारे अशा सूचना देण्यात येत आहेत की, महाराष्ट्र दुकाने आणि संस्था नियम-१९६१ मधील कलम २०-अ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येऊन सर्व दुकाने व आस्थापनांचे नाम फलक मराठीतच लावण्याबाबत सर्व आस्थापनांना सूचना देण्यात याव्यात. व सदर सूचनांचे काटेकोर पालन होईल असे पहावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(पंकज कुमार)
शासनाचे उप सचिव

प्रति,

प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.

कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व दुकाने निरिक्षकांना याबाबत सक्त सूचना देण्यात याव्यात.

सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य,

यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रकातील सुचना आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व नगर परिषदांच्या निदर्शनास आणाव्यात.

सर्व महानगर पालिका आयुक्त, महाराष्ट्र राज्य,

त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात या परिपत्रकातील सूचनांचे काटेकोर पालन होईल असे बघावे.

मुख्य निरीक्षक (दुकाने), दुकाने व आस्थापना खाते, भिमाबाई राणे म्युनिसिपल स्कुल बिल्डींग, ४ था मजला, सेंट्रल प्लाझा सिनेमाजवळ, रा.मो.मार्ग, मुंबई- ४०० ००४.

महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

निवड नस्ती (कामगार-९), उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.